# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. २९/११/२०१२**

आज सोमवार दि. २९/११/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि.२५/१०/२०१२ रोजीची तहकुब मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. २ दि. १५/१०/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | मा. महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | मा. उपमहापौर |
| ३) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ४) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ५) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ६) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ७) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ८) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १०) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| ११) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १२) | निलम हरिश्चंद्र ढवण | सदस्या |
| १३) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १६) | अरविंद दत्ताराम ठाकुर | सदस्य |
| १७) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १८) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| १९) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २०) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २१) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २२) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २३) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २७) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २९) | मुन्ना सिंग | सदस्य |
| ३०) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३१) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३२) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३३) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३४) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३५) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३६) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३७) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ३८) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ३९) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४१) | डिमेलो बर्नट अल्बर्ट | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४३) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४४) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ४५) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ४६) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४७) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४८) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ४९) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५०) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५१) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५२) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५३) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५४) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५५) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५६) | इनामदार जुबेर | सदस्य |
| ५७) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५८) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६०) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६१) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६२) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६५) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६६) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६७) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६८) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६९) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७०) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७१) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७२) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७३) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७४) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ७५) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७६) | प्रभाकर पद्‌माकर म्हात्रे | सदस्य |
| ७७) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७८) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७९) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| २) | कांगणे यशवंत धगाजी | सदस्य |
| ३) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ४) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ५) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६) | जैन गिता भरत | सदस्या |
| ७) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ८) | तांगडे प्रतिभा प्रकाश | सदस्या |
| ९) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| १०) | जैन सिमा महेंद्र | सदस्या |
| ११) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| १२) | म्हात्रे परशुराम पद्‌माकर | सदस्य |
| १३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |

<u>**रजेचा अर्ज -**</u>

१) प्रभात प्रकाश पाटील सदस्या
२) ग्रिटा स्टिफन फॅरो सदस्या

**मा. महापौर :-**

आजच्या सभेला उपस्थित सर्वांचे मी स्वागत करते. सचिव महोदय, दि.२५/१०/२०१२ च्या तहकुब सभेचे कामकाज सुरु करण्यात यावे.

**प्र. नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा गुरुवार दि. २५/१०/२०१२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ३, ४ व ५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **गुरुवार दिनांक २९/११/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता** मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

**मा. महापौर :-**

मी आजच्या तहकुब महासभेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ एक (अ)(अ) नूसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गटनेते श्री. बर्नड डिमेलो यांना विनंती करीत आहे की, त्यांनी मा. सभागृह नेत्यांचे नाव द्यावे. तसेच १९ एक (अ) (अ) नूसार भारतीय जनता पक्षाचे गटनेते श्री. शरद केशव पाटील यांनी ही मा. विरोधी पक्षनेत्यांचे नाव द्यावे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर, नुकतेच आमचे आदरणीय शिवसेनाप्रमुख यांचे निधन झाले आणि त्यांचे व्यक्तीमत्व आणि विचार पाहता सर्व पक्षीय आणि सर्व धर्मीय यांचे ते चाहते होते. अशा या महान नेत्यास सभा चालू होण्यापूर्वी श्रध्दांजली अर्पण करावी. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांनी सुचविलेल्या सुविधा भुखंडावर बांधण्यात येणाऱ्या नाट्यगृहास हिंदुह्दयसम्राट स्वर्गीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे व त्यांच्या झालेल्या दुःखद निधनामुळे त्यांना श्रध्दांजली वाहुन आजची सभा तहकुब करण्यात यावी व तहकुब सभा दि.३०/११/२०१२ च्या मा. विशेष महासभेच्या समाप्तीनंतर त्याच दिवशी घेण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, हिंदुह्दयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाले आहे. त्याबद्दल आम्हाला सर्वांनाच त्याचे दुःख आहे. श्रध्दांजली वाहीलीच पाहिजे मात्र शिवसेनेच्या गटनेत्यांनी आत्ता जो ठराव मांडला त्याच्यामध्ये सभा तहकुब करण्याचा ठराव हा योग्य नाही. श्रध्दांजली द्यावी. तहकुब सभेमध्ये ही प्रथा नसतानासूध्दा आम्ही तहकुब सभा संपल्यानंतर या विषयावर शोकप्रस्ताव मांडता येईल. त्यांना जो नामकरण करायचा प्रस्ताव मांडायचा आहे, तो ही ठिक आहे. तो विचाराधीन राहील. मात्र सभा तहकुब करणे हा योग्य निर्णय नाही. त्यांनी केलेल्या ठरावावर आम्हाला ठराव लागेल. माझी फक्त विनंती आहे की, त्यांनी असा ठराव करु नये. श्रध्दांजली वाहावी. आजच्या सभेनंतर शोकप्रस्ताव मांडता येईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, श्री. बाळासाहेब ठाकरे हे एक राष्ट्रीय नेते होते. ते नेत्यापेक्षा एक व्यक्तीमत्व होते. या मिरा भाईंदर शहरामध्ये ज्या ज्या वेळी एखादा लोकप्रतिनीधी असू द्या, एखादे माजी उपमहापौर श्री. दिलीप बाबर असु द्या, श्री. प्रफुल्ल पाटील असु द्या माजी नगराध्यक्ष या सर्वांना आपण श्रध्दांजली देऊन सभा तहकुब करुन त्यांना आपण श्रध्दांजली दिली. मग एवढ्या ज्येष्ठ नेत्यांसाठी आपल्याला असे वाटते का की, आजची सभा आपण तहकुब करु नये. इतर महापालिकेतसुध्दा आपण बघितले तरी या सगळ्या सभा तहकुब झाल्या आहेत आत्ता अधिवेशन आहे, विधीमंडळ जरी बघितले त्यादिवशी तहकुब होणार आहे म्हणजे आपण एवढे मोठे झालो का की, दहा मिनिटासाठी तहकुब करुन तरी त्यांना श्रध्दांजली वाहावी. आमची खास अशी विनंती आहे की, आजची सभा त्यांना श्रध्दांजली वाहून तहकुब करुन उद्या मिटींग संपल्यानंतर त्या ठराव मांडतात त्याप्रमाणे घेण्यात यावी. आपल्या महापालिकेत प्रथा आहे की, एकदा श्रध्दांजली वाहील्यानंतर आपण कुठलाही विषय घेत नाही. मग आपण आत्ता श्रध्दांजली वाहायची, नंतर परत विषयाला सुरुवात करायची का?

**मा. महापौर :-**

सर्वांनी पहिले बसुन घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

आपण श्रध्दांजली साठी उभे केले आहे.

**मा. महापौर :-**

श्रध्दांजली साठी बरोबर आहे तुम्ही त्याच्यातच चर्चापण करत आहात म्हणुन पाच मिनिटे बसून घ्या. चर्चा करा नंतर आपण सांगु की, तहकुब करणार आहे की, काय करणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, समजा ठराव मांडल्याप्रमाणे सभा तहकुब झाली तर त्याला परत कोरम लागेल का?

**प्र. नगरसचिव :-**

तिसऱ्या वेळेला जेव्हा तहकुब झालेली सभा चालु होईल त्याला कोरमची आवश्यकता नाही.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला याच्याकरीता परत ठराव द्यावा लागेल?

**प्र. नगरसचिव :-**

तुमचे दुसरे म्हणणे असेल तर तुम्ही ठराव द्या.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला आज सभा चालवायची आहे.

**प्र. नगरसचिव :-**

मग तुम्ही ठराव द्या.

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम, आपण या शहराचे प्रथम नागरीक आहात आणि सर्व पक्षांचे कामकाज म्हणून आपण पिठासीन अधिकारी म्हणून काम करत आहात. आपल्याला असे वाटते की, या विषयावर दोन ठराव झाले पाहिजे? पूर्ण सभागृहाला माझी विनंती राहिल की, आपण आज आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांना श्रध्दांजली वाहून आजची सभा तहकुब करुया उद्या आपली सभा आहे ती मला वाटत नाही की, एक-दिड तासापेक्षा जास्त चालेल. मॅक्झीमम दोन तास त्यानंतर ही सभा आपल्याला चालवता येईल. अनेकदा आपण या शहरातील लोकप्रतिनींधींना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण सभा तहकुब केलेली आहे आणि आज एवढ्या जेष्ठ नेत्यासाठी आपल्याला असे वाटते की, हे दोन ठराव घेतले पाहिजे मागे पत्रकार बंधुसुध्दा बसलेले आहेत ते आपल्या मिरा भाईंदर शहरावर हसतील हे शहर आपल्यावर हसेल की, एवढ्या व्यक्तीमत्वासाठी आपण दोन-दोन ठराव करुन सभागृहात भांडायचे का? माझी या सभागृहाला विनंती राहील, श्री. जुबेर इनामदार यांना विनंती राहील काही फरक पडत नाही. आपण आज आत्ता निर्णय घेतला किंवा उद्या निर्णय घेतला. सभागृहाला एक विनंती आहे की, आजची सभा तहकुब करुन आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांना आपण श्रध्दांजली वाहुया.

**मा. महापौर :-**

सर्वांच्या अनुमतीने मी आजची सभा तहकुब करीत आहे आणि उद्या आपण विशेष सभा लावली आहे त्यानंतर ही तहकुब सभा चालवू. सर्वांनी श्रध्दांजली साठी उभे राहायचे आहे.

**प्र. नगरसचिव :-**

सर्वांनी श्रध्दांजली साठी शांत उभे राहायचे आहे.

**(दोन मिनिटे शांत उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)**

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.३२ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**